# बुद्धकालीन समाज-दर्शन

**सुरेखा दिनेश गांगुर्डे**
पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर

गंगेच्या मैदानावरील वैदीक आर्यांच्या वसाहती आणि त्यांना अनुषगीक अशा ख्रिस्तपूर्व पहिल्या सहस्त्रकाच्या उत्तरार्धातील घडामोडी यांचा अभ्यास करण्यासाठी निरनिराळी साधने उपलब्ध आहेत. या बाबतीत प्राचीन पाली भाषेतील बौध्द ग्रंथ फार महत्वाचे आहेत. बौध्द संघाचे नीति-नियम सांगणारा "विनय-पीटक", बुध्दाच्या प्रवचनांचा संग्रह असलेला "अभिधम्म-पीटक" हे ग्रंथ त्या काळातील बदलत्या जीवन- सरणीवर व विचार-सरणीवर प्रकाश टाकतात. हे पीटक ग्रंथ व बुध्दावताराच्या ५५१ जातक कथा केव्हा लिहिल्या गेल्या याविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहेत. यापैकी बहुतेक ग्रंथ ख्रिस्तपूर्व ६०० ते ४०० या कालखंडात आणि जातक-कथा त्यानंतर त्यानंतर लिहिल्या गेल्या असाव्यात. पाली ग्रंथ मगधच्या भाषेत आहेत त्या अर्थी त्यांच्यात उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग व बिहार या टापूतील लोक-जीवनाचे प्रतिबिंब पडले असले पाहिजे. ख्रिस्तपूर्व ५०० ते ४०० या दरम्यान पाणिनीने रचलेले संस्कृत भाषेचे व्याकरण, ख्रिस्तपूर्व ६०० ते ३०० या काळात लिहिले गेलेले "गृहयसूत्र" व "धर्मसूत्र" ५०० ते ४०० या दरम्यान पाणिनीने रचलेले संस्कृत भाषेचे व्याकरण, ख्रिस्तपूर्व ६०० ते ३०० या काळात लिहिले गेलेले "गृहयसूत्र" व "धर्मसूत्र" हे ग्रंथ आणि पीटक वगैरे पाली ग्रंथ यांचा एकत्र अभ्यास केल्यास एकंदरीत उत्तर भारताचे विश्वसनीय चित्र डोळयापुढे उभे राहते.

पुराण -वस्तु-संशोधकांनीही अगणित पुरावा साठवला आहे. अहिच्छत्र, हस्निनापूर,
कौशांबी, उज्जयिनी, श्रावस्ती, वैशाली आणि ग्रंथांमध्ये उल्लेखिलेल्या कित्येक इतर ठिकाणी गेल्या पन्नास-साठ वर्षात उत्खनने झाली. या उत्खननांत घरांचे, इतर इमारतींचे व नगराचे अवशेष सापडले आहेत. "उत्तरेकडील काळी चकाकणारी भांडी" वगैरे शेकडो वस्तूही सापडल्या आहेत. ग्रंथांमधील उल्लेख व हे पुराण वस्तु-शास्त्रीय अवशेष यांचा एकत्र विचार केल्यास ख्रिस्तपूर्व पहिल्या सहस्त्रकाच्या उत्तरार्धात, उत्तर- प्रदेशाचा पूर्व भाग व बिहार यांच्यासकट संबंध ईशान्य भारतात कोणती सामाजिक व आर्थिक परिवर्तने घडून

आली हे स्पष्ट दिसते. याच कालखंडात वैदिक आर्य या प्रदेशात घुसले आणि तेथे एक नवी कृषिप्रधान अर्थ व्यवस्था अमलात आली.

*"यदा हवे पातुभवन्ती धम्मा*
*आतापिनो झायतो ब्रारम्हणस्य |*
*अथसय कडखा वपर्यन्ति सब्बा*
*यतो पजानोति सहेतुधम्मं||"*

जेव्हा वस्तुंचे सम्यक स्वरूप उत्साही व विचारी ब्राम्हणाला स्पष्ट होते, तेव्हा वास्तविक स्वरूपांचे सकारण ज्ञान झाल्याने सर्व संशय निवृत्त होतात.

– बोधिकथा, महावग्गपालि

महापुरुषांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव त्यांच्या जीवनकालापुरता सीमित नसतो तर त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या कार्याचे व विचारांचे पडसाद मानवी समाजावर पडलेले दिसतात. अनेक शतके त्यांच्या विचारांच्या जीवनवृक्षांना बहर येत राहतो व ते बरेवाईट फळे देत राहतात. त्यांच्या "अतीत आयुमर्यादा संपल्या की मगच ते वटवृक्ष इतिहासजमा होतात. या फळांचा बरेवाईटपणा ज्यांना समजत नाही ते पुरोगामी वा प्रतिगामी भूमिका बजावतात. बुध्दांचा विचार त्यांच्या तत्त्वज्ञानातून समजतो. त्या विचारांच्या पार्श्वभूमीवर त्या समाजाची रचना कशी होते ते कळते. बुध्दकालीन समाजाचे चित्रण करण्यापूर्वी वैदिक समाज समजावून घ्यावा लागतो.

**वैदिक समाज दर्शन :**

ऋग्वेद हे वैदिक वाङ्मयातील अतिप्राचीन साहित्य आहे. पुढील काळात संहिता, साम, यजुर्वेद, अथर्ववेद ह्या ग्रंथांची निर्मिती झाली. ऋग्वेदातील सूक्तकर्त्याचे भौगोलिक ज्ञान हे त्यांनी केलेल्या विविध नद्यांच्या उल्लेखावरून निश्चित करता येते. ऋग्वेदातून पूर्व अफगाणिस्तान , स्वात नदीचे खोरे, पंजाब, सिंधु गंगेचा जलविभाजक या प्रदेशांचा अधिक परिचय होता. ह्या सप्तसिंधूच्या प्रदेशात पर्जन्यमान अधिक होते. जंगलव्याप्त प्रदेशामुळे येथे पशुपालन व्यवसाय विकसित झाला. समाजात आर्यवर्ण व दासवर्ण असत 'वर्ण' हा त्वचेच्या रंगाचा निदर्शक मानला जाई, असे वरकरणी वाटत असले तरी वर्णाचा संबंध आर्य, दास, दस्यूपणी या भेदांसाठीच वापरला जात होता. अनार्यांच्या भाषा, धर्मविधी, देवता, रीतिरिवाज यांच्या भिन्नतेच्या उल्लेखावरून वर्ण हे भिन्नतेचे आधुनिक प्रतिक म्हणूनच

वापरले जात होते. ऋग्वेदात दासांना 'अनास' म्हणजे बसक्या नाकाचे असे संबोधत याचा अर्थ 'तोंड नसलेले' ओळख नसलेले असाही संभवतो. ज्या आर्यांची भाषा माहित नाही, त्यांना अनास म्हणत. ऋग्वेदात भिन्न भिन्न संस्कृतीच्या समाजाचे उल्लेख आढळतात. पण ऋग्वेदातील सुक्ते आर्यभाषिकांनी केलेली असल्यामुळे त्यांचाच समाज जास्त प्रभावी ठरला असे दिसते. दासांकडे पशूधन ही अमाप संपत्ती होती. या धनाचे रक्षण ते अत्यंत काळजीपूर्वक करत. म्हणूनच दासांबद्दल भय आणि द्वेष या भावना अतितीव्र स्वरूपाच्या होत्या. पुढे अनेक शतकानंतर आर्यांनी अंकित केलेल्यांना दास किंवा गुलाम म्हटले जावू लागले. हा अर्थबदल पशुपालन व्यवसायाच्या अवनतीचाही निदर्शक असावा. कारण पशुपालक समाजासाठी गुलामांना ताब्यात ठेवणे अवघड झाले असावे. असे असले तरी एक गोष्ट कायम राहिली ती म्हणजे आर्य शब्दाचा अर्थ "प्रतिष्ठित पुरूष", बहुधा "आर्यभाषा बोलणारा" असा होता.

पशुपालक समाज घोडे व दुभती जनावरे यांच्या सोबत चारापाण्यासाठी सतत स्थलांतर करत असे. स्थलांतर करताना त्यांचे स्थानिक शेतक-यांशी अन्नधान्ये व इतर गरजेच्या वस्तूंचे आदानप्रदान चालत असे. वस्तू विनियमयासाठी गाय हे मूल्य वापरले जात होते.

समाजात सर्वात लहान घटक कुल म्हणजे कुटुंब असे. अनेक कुटुंबाचे मिळून ग्राम बने. पुत्रजन्माचे स्वागत होत असे. पितृसत्ताक कुलात स्त्रीचे स्थान प्रसंगानुरूप बदलत गेले. कधी मुक्त तर कधी बंदिस्त! पशूपालक समाजात अग्नीला महत्त्व होते. दानवृत्ती खोलवर रूजलेली होती.

इसवी सनाच्या पहिल्या शतकात लवचिक असणारा आर्य समाज नितीनियमांच्या उच्चनिचतेच्या कल्पनांनी जखडला गेला. वेदात ब्र्रम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या चार वर्णांचा उल्लेख येतो. पहिल्या तीन वर्णांना व्यावसायिक निकष होते. तसे चौथ्या गटांला नव्हते. शूद्र वर्णात व एकूनच त्यांच्या जीवनमानात मोठा बदल झाला. पूर्वी दासस्वामी व दास कोण हे ठरवण्यासाठी गोत्रसंबंध व वंशप्रतिष्ठा लक्षात घेत असत. आता जे सगोत्राने संबंधित नव्हते ते श्रमिक गटात समाविष्ट झाले. त्यांना वरील वर्णांची सेवा करण्याचे काम देण्यात आले. ऋग्वेदात दास शब्द वेगळ्या संस्कृतीचा घटक म्हणून वापरला जाई. आता तो दुसऱ्यांची सेवा करणारा म्हणून वापरला जावू लागला. पुढे शूद्रांचा व्यवसाय कनिष्ठ सेवा पुरविणे हाच ठरला.

आता समाजाची विभागणी अधिक टोकदार बनली. श्रम विभागणी सामाजिक दर्जा ठरविणारा निकष बनला. सेवा करणारा दास, लहरीनुसार सेवेतून हाकलला जाणारा असे शूद्राचे वर्णन केले आहे. समाजाच्या या विभागणीमुळे नंतरच्या शतकात नवीन संस्कृतीला व नवीन लोकसमूहांना समावून घेणे सोपे झाले.

कृषक पशुपालन समाज स्थिरावला धार्मिक विधींना बळकटी आली . यज्ञविधीला महत्व प्राप्त झाले. यज्ञकर्माचे स्तोम माजले. यज्ञ पुरोहिताला महत्व आले. ज्याच्या जवळ गूढ मांत्रिक शक्ती आहे तो ब्रम्हा ठरला. देवता पुरोहित हे क्षणभर संपूर्ण तादात्म्य पावतात. जेवढे दान देवू तेवढे अनेक पटीने परत मिळते असा समज दृढ झाला. धनसंग्रही प्रजेला उत्पादनातील काही भत्ता यज्ञ विधीसाठी दयावा म्हणून दबाव आला. यज्ञामुळे क्षत्रियांना वैश्य व शुद्र यांच्यावर अधिकाधिक सत्ता गाजविण्याची गरज निर्माण झाली. व तशी सत्ता गाजविण्यास मदतही झाली. वैश्य हे क्षत्रियांचे अन्न असून क्षत्रिय हे वैश्याला खात आहेत असे म्हटले जावू लागले. मृतांना पुरण्याऐवजी दहनाची प्रथा प्रचारात आली. मरणोत्तर जीवनाकडे पापाची शिक्षा किंवा पुण्याचे फळ म्हणून पाहिले जावू लागले.

**बुध्दकालीन समाज:**

बुध्दाने स्थापलेला धर्म लवकरच आशिया खंडात लोकप्रिय झाला. कारण बुध्दाचे तत्वज्ञान माणसाच्या अत्यंत जवळ जाणारे होते. बुध्दाने चार आर्यसत्ये सांगितली त्यानुसार जग दु:खमय आहे, मानवी तृष्णेमुळे दु:ख उत्पन्न होते. तृष्णेचा त्याग करण्यासाठी अष्टांग मार्ग सांगितला. या सर्वांना मिळून "मध्यमा प्रतीपत्री" म्हणतात. बुध्दाचे हे प्रवचन समजण्यासाठी गहण तात्विक विचारांची व गूढ कर्मकांडांची गरज नव्हती तर केवळ शिल हा गुण हवा होता. मानवाच्या मनातील शील जातीच्या अधिकारावर किंवा पात्रतेवर अवलंबून नव्हते तर ते मानवी कल्याणाच्या विचारावर आधारीत होते. बुध्द आपल्याला विश्वाचा उदय व -हास ही नैसर्गिक प्रक्रिया आहे असे सांगतो. बुध्दाला ब्राम्हणी कर्मकांड, पशुयज्ञ मान्य नव्हते. तसेच तर्क व बुध्दीला पटणारे तात्कालीन प्रश्नावरील चिंतन करण्यास बुध्दाने समाजाला शिकविले. बुध्दाचा कर्मसिंध्दांत वर्ण समाजाच्या रिती रिवाजांनी जखडलेला नव्हता. सुखी जीवनासाठी अष्टांग मार्गाचे पालन करुन आपल्या कर्मात सुधारणा करावी असे बुध्द सांगतो. स्त्रीयांनी भिक्षूनी धर्म स्विकारला तर विवाह, कुटूंबसंस्था दुर्बल होतील असे आघातही त्याला स्विकारावे लागले. भिक्षुनींनी थेरगाथा लिहिल्या, त्यामुळे भारतात

प्रथमच गणिकांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. स्त्रियांना संपत्तीवरील हक्क व दान देऊ शकण्याचा अधिकार बुध्दाने मान्य केला. हे जाती संस्थेला मोठे आव्हानच होते.

बिहार प्रदेशात बौध्द धर्माच्या प्रचार, प्रसारामुळे शिक्षणास गती आली, तेथील शिक्षण सर्व जातीजमातींसाठी खुले झाले. प्रो. -हाइस डेव्हीड म्हणतात, " ज्या भिक्षु संघावर बुध्दाचे संपूर्ण नियंत्रण होते, त्यात प्रवेशासाठी जन्माची कुलीनता, पैशाची प्रतिष्ठिता, वंशाची शुध्दता, जातीची उच्चता या पैकी कोणत्याही घटकाची अट नव्हती". बुध्दाच्या मते सर्व नदया आपल्या नामगोत्रासह महासागरात विलिन झाल्यावर त्या केवळ महासागर या एकाच संज्ञेला प्राप्त होतात. त्याप्रमाणे चारही वर्ण तथागतप्रवर्तित धर्मविनयानुसार गृहत्याग करुन गृहहिनतेत विलिन होतो, तेव्हा त्याच्या नामगोत्रांचा लोप होवून तो केवळ शाक्यपुत्र श्रमण यांच संज्ञेला प्राप्त होतो. बुध्दाने स्वत:ला "बहुजनहिताय बहुजनसुखाय" या कार्याला वाहून घेतले होते. अनेक हिनकुलोत्पतीनी भिक्षु संघात महत्वाची पदे प्राप्त केली होती. विनयपिटक या भिक्षु संघाच्या संघटनेचा सर्वोच्च अधिकारी उपालि पूर्वाश्रमिचा न्हावी होता. थेरगाथेत समाविष्ट झालेली सुनित ही या सफाई कामगार होती. सतीकोळी, नंदगोपाळ, पंथक, बंधद्वय एका कुलीन स्त्रीला दासापासून झालेली संतान होती.

**परिवर्तनाची नांदी :**

बुध्दाने भिक्षु व भिक्षुणींचा संघ बनविला. वर्ण जाती भेदातील समतेच्या तत्वावर भर दिला. निरुत्पादक पशु हिंसेला विरोध केला, कर्मकांडाला विरोध केला, दु:खमुक्तीसाठी अध्यात्मिक आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्ग सांगितला. बुध्दाला दास प्रथा मुलक समाज क्रांतीचा प्रवर्तक म्हणतात. सामंतप्रथाक क्रांतीचा प्रवर्तक म्हणतात. भारतातील लोकशाही, स्वातंत्र समतेचा प्रवर्तक म्हणतात, तो निर्वाण, मोक्ष, मुक्ती, स्वातंत्र्याचा सिध्दांत मांडणारा युगप्रवर्तक बनला.

जैन आणि बौध्द धर्म समांतर चालणारे धर्म होते. बौध्द धर्माने व काही प्रमाणात जैन धर्मानेही ऐहिक जीवनात होत असलेला बदल लक्षात घेऊन वैदिक कर्मकांडाला विरोध केला हे खरे तथापि दोन्ही धर्मानी जातीपाती मोडण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. ब्राम्हण व क्षत्रिय यांच्यात आपापल्या हित संबंधांपायी संघर्ष होऊ लागला. महावीर व गौतम बुध्द दोघेही जन्माने क्षत्रिय होते या वस्तुस्थितीचा त्या संघर्षाशी अनेकदा संबंध जोडला जातो. या संघर्षात बौध्द धर्माने क्षत्रियांना वरचे स्थान दिले व ब्राम्हणांना त्यांच्या खालचे. बौध्द धर्म

ग्रंथांनी ब्राम्हणी अवडंबराचे व कर्मकांडाचे मोठया कौशल्याने खंडन केले. बौध्द व जैन दोन्ही धर्मानी खालच्या श्रेणीतील जातीबद्दल उदार दृष्टीकोन स्वीकारला. चारही वर्णाचे लोक बौध्द संघात सामील होऊन भिक्षू होऊ शकत असत. इतकेच नव्हे तर चांडाल, पुक्कुस, यांच्यासारख्या अस्पृश्य जातींचे लोकही निर्वाण प्राप्त करु शकत असत. कित्येक क्षत्रियांना व ब्राम्हणांना दुर्लभ असे अनंत सुखाचे निर्वाण पद मतंग नावाच्या एका चांडालाला प्राप्त झाले होते.

बुध्दाप्रमाणे महावीरानेही त्याच्या जैन संघात स्त्रियांना प्रवेश दिला होता. त्याची पहिली शिष्या एक बंदीवान गुलाम स्त्री होती. त्याच्या अनुयायांमध्ये पुष्कळ स्त्रिया होत्या, असे एका आदिम जैन ग्रंथात म्हटले आहे. परंतु त्या मोक्षाच्या अधिकारी होत्या किंवा नाही हा नंतरच्या जैन साहित्यात जबर वादाचा विषय राहिला आहे.

खालच्या जातींच्या लोकांना ज्ञान संपादनाच्या बाबतीत दोन्ही धर्मानी मनाई केली नाही. जो माणूस गुरु होतो तो कोणत्याही जातीचा असला तरी आदरणीय आहे, असे दोन्ही धर्म म्हणतात. एका ब्राम्हणाने एका चांडालाकडून मंत्र शक्ती ग्रहण केली होती, परंतु आपल्या त्या चांडाल गुरुचे नाव सांगण्याची त्याला शरम वाटली म्हणून त्याची ती मंत्र शक्ती नाहीशी झाली, अशी कथा एका बौध्द जातकात सांगितली आहे. अशीच एक गोष्ट नंतरच्या एका जैन ग्रंथात सांगितली आहे की, एका मातंगाकडून मंत्रविद्या शिकत असताना एक राजा खालच्या आसनावर बसत असे अशा कथांवरुन दिसते की, खालच्या जातींचे लोक बौध्द व जैन धर्माची दीक्षा घेत असत. कदाचित गरीबीपायी ते हा धर्म स्विकारीत असावेत.

समाजातील निकृष्ट जातींबद्दल बौध्द व जैन हे दोन्ही धर्म सहिष्णू होते हे या दोन्ही धर्माच्या ग्रंथातूनही दिसून येते. बौध्द किंवा जैन भिक्षू किंवा भिक्षुणी चारही वर्णाच्या कुटुंबाकडे भिक्षेसाठी जाऊ शकत असत किंवा त्या कुटुंबानी आमंत्रण दिल्यास त्यांच्याकडे जेवण करु शकत असत. विणकर वगैरे खालच्या जातींच्या कुटुंबाकडून अन्न स्विकारण्यास एका जैन ग्रंथाने जैन भिक्षूला संमती दिली आहे परंतु भिक्षु भिक्षुणींच्या या प्रथेचा बौध्द व जैन सामान्य अनुयायांवर कितपत प्रभाव पडला होता हे सांगता येत नाही.

दासांना व कर्जबाजारींना बौध्द व जैन संघांमध्ये प्रवेश नव्हता, ही वस्तुस्थिती असे सुचवते

की, त्या काळातील जाति-व्यवस्था या दोन्ही धर्मांनी जशीच्या तशी स्विकारली. एका जातक-कथेत दावा केला आहे की, क्षत्रिय व ब्राम्हण या उच्च जातींमध्येच बुध्द जन्म घेतो, वैश्य व शुद्र जातींमध्ये कधीच नाही. तसेच एका जैन ग्रंथात म्हटले आहे की, जैन गुरु शूद्र, क्षुद्र, अधम, दरिद्री व ब्राम्हण कुटुंबात जन्म घेत नाहीत. काही जैन आख्यायिका सांगतात की, प्रथम महावीर एका ब्राम्हणीच्या पोटी संभवला होता, परंतु तिच्या पोटातून तो गर्भ काढून त्रिशला या प्रतिष्ठित क्षत्रिय स्त्रीच्या पोटात घालण्यात आला व त्रिशलाने त्याला जन्म दिला. जैनांचा ब्राम्हणांविषयी तीव्र द्वेषभाव या कथेतून व्यक्त होतो. ब्राम्हणांखेरीज ज्या अन्य जातींमध्ये जैन गुरु जन्म घेत नाही असे मानले जाते त्या सर्व जाती समाजाच्या खालच्या थरातील आहेत.

या दोन्ही धर्मानी दासांची अवस्था सुधारण्याचा मात्र थोडाफार प्रयत्न केला. मनुष्यप्राण्याची खरेदी विक्री करण्यात आपस्तंबाने फक्त ब्राम्हणांना मनाई केली होती. या दोन धर्मानी ती सर्व जातींना लागू केली. दिग्घ निकालात म्हटले आहे की, मालकाने त्याच्या दासांना समंजस्यपणे वागवावे. एक जैन ग्रंथ म्हणतो की, कामासाठी वेतनावर ठेवलेल्या दास, दासी, कर्मकार व कर्मचारी यांना काम देणा-याने सुस्थितीत ठेवले पाहिजे. अशा धर्मादेशांमुळे निदान भिक्षू भिक्षुणींच्या मनात तरी या पीडित वर्गांबद्दल दया व औदार्य निर्माण होत असले पाहिजे. परिणामी या दोन धर्मामध्ये खालच्या जातींच्या लोकांचा भरणा वाढत असला पाहिजे.

बौध्द धर्माचा प्रसार केवळ भारतातच नाही तर जगाच्या अनेक देशांत झाला. चीन, श्रीलंका, जपान, जावा, सुमात्रा अशा अनेक देशांनी बौध्द धर्म स्विकारला. भारतात गौतम बुध्दाच्या जीवन काळातच बौध्द धर्म अतिशय लोकप्रिय झाला होता. बौध्द धर्माच्या पुर्वी स्थापन झालेल्या किंवा बौध्द धर्मानंतर स्थापन झालेल्या इतर कोणत्याही धर्मास हे भाग्य लाभले नाही. बौध्द धर्माला लोकमान्यता मिळण्याची थोडक्यात पुढील कारणे होती. गौतम बुध्द हा आदर्श नेता, साधी शिकवण व सदाचाराला महत्व लोकभाषेचा तत्वज्ञानासाठी स्विकार, मानव उच्च निचतेऐवजी समानतेची वागणुक, शुध्दोधन, बिंबीसार, अशोक, मिलिंद इ. राजांनी बौध्द धर्माला राजाश्रय दिला. भिक्षुंनी मानवतावादी कार्य केले. थेरवादी तत्वज्ञानाने मानवी मुक्तीसाठी वैचारीक तत्वज्ञान मांडले.

## संदर्भ ग्रंथ –

2500 years of Buddhism, Prof. P.V. Bapat, the ministry of information and board Casting Govt. of India, 1956

Ancient Indian History and civilazition, S.N. Sen, Wiley Eastern Lit. New Delhi, 1988

The Essentials of Buddhis Philosophy, Junjiro takakusu, Asia bublishing house, Bombay, 1949

A survey of Indian History , K.m. Paikkar, the National information and Pub. Ltd. Bombay 1947

Ancient Indian Political thoughts and Institutions, H. R. Mukhi, Surjeet Book dept. Delhi, 1970

The Budha and his message, the heart of enlightement, bodili, chitta, Popular Book dept. Bombay 1957

बुध्द मानस दर्शन, डॉ. मनिष आनंद, धम्मदूत मनिष आनंद, औरंगाबाद

बुध्द भारतीय इतिहासातील लोकशाही, स्वातंत्र व समतेचा अग्निस्रोत, शरद पाटील, सावित्रीबाई फुले प्रकाशन, येवला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर , वसंतमून, एनबीटी दिल्ली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर , वसंतमून, एनबीटी दिल्ली

धारण करे तो धर्म – आचार्य सत्यनारायण गोयंका, धम्मगिरी नाशिक

महासतिपट्टानसुत्र विपश्यना विशोधन विन्यास, इगतपुरी

अर्ली इंडिया प्रारंभापासून इ.स. १३०० पर्यंतचा शतहास रोमिलाथापर, अनु. र. ना. गायधनी.

भारतीय शिल्पवैभव, प्राचीन मध्ययुगीन, डॉ.सु.र.देशपांडे मेहता पब्लिशिंग हाऊस.